॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. २२ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३६४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

* सुविचार *
ध्येयाचा ध्यास लागला की,
यश हमखास मिळतेच

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### कॉकरोच

आव्हान देणारांना कधी
समजायचे नसते झुरळ
खाजवली व्यवस्था की
मग अंगावर येतात पुरळ
अशी एक खदखद आहे
जी आतबाहेर छळते आहे
मिडीयावरचा धूर सांगतो
खोल काहीतरी जळते आहे

## SPOT NEWS

### रेल्वे कोचला भीषण आग

● **नांदेड –** रेल्वे प्लॅटफॉर्मपावून अवध्या काही अंतरावर उभ्या असलेल्या एका कोचला अचानक आग लागली. अवघ्या काही वेळात या आगीने रौद्ररूप धारण केले होते. सदर घटना नांदेड येथील हुजूर साहेब रेल्वे स्थानकावर दि. २१ मे सकाळच्या सुमारास घडली. या घटनेमुळे काहीवेळ धावपळ उडाली. मात्र सुदैवाने हा कोच रिकामा होता, यामुळे मोठी दुघटना टळला. नांदेड येथील हुजूर साहेब रेल्वे स्थानकाच्या बाजूला अतिरिक्त वा दुरूस्तीसाठी स्टेबल लाईनवर असे कोच ठेवले जातात. दि. २१ मे रोजी सकाळच्या सुमारास प्लॅटफॉर्म लाईनपासून काही अंतरावर उभ्या असलेल्या रिकाम्या रेल्वे कोचला अचानक आग लागली. उष्णतेमुळे अवघ्या काही वेळात या आगीने रौद्ररूप धारण केले. तेव्हा काहीवेळ धावपळ उडाली.

### भारताच्या पुढाकाराने रशिया-युक्रेन युद्ध थांबू शकते

● **नवी दिल्ली –** रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध संपवण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारताने रशियावर अधिक दबाव आणला, तर राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आपली भूमिका बदलून युरोपमध्ये शांतता प्रस्थापित करू शकतील, अशी आशा एस्टोनिया या देशाच्या मंत्र्यांनी व्यक्त केली आहे. सन २०२२ पासून रशिया आणि युक्रेन युद्ध सुरू आहे. अद्यापही हे युद्ध थांबलेले नाही. रशिया आणि युक्रेन देशांमधील तणाव कमी होताना दिसत नाही. परंतु, आता शांततेच्या आशा आता वाढत असल्याचे म्हटले जात आहे.

# राष्ट्रीयीकृत बँकांच्या कार्यपद्धतीवर मुख्यमंत्र्यांची नाराजी

## सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यस्तरीय बँकर्स समितीची (एलएसबी) बैठक

● **मुंबई । वीरभूमी –**
जिल्हा सहकारी आणि ग्रामीण बँका मिळून ६७ टक्के शेतकऱ्यांना तर राष्ट्रीयीकृत बँका २६ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतात. जिल्हा बँकांचे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट ८० टक्के आहे तर राष्ट्रीय बँकांचे उद्दिष्ट केवळ ६७ टक्के आहे. याचा अर्थ असा आहे की, राष्ट्रीयीकृत बँका पीक कर्जाच्या अपेक्षित गांभीर्य दाखवत नाहीत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी राष्ट्रीयकृत बँकांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. या ८० टक्क्यांच्या वर पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याची सूचना करताना फडणवीस यांनी शेतकऱ्यांकडे सिबिलची मागणी न करण्याचे निर्देश दिले.



आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यस्तरीय बँकर्स समितीची (एलएसबी) बैठक पार पडली. या बैठकीत सन २०२६-२७ या वर्षाचा कृषी पीक कर्जाचा पतपुरवठा, पीक कर्जवाटप आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यावर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

राज्यातील गेल्या वर्षीच्या खरीप हंगामात पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण न केल्याबद्दल राष्ट्रीयीकृत बँकांना फाटकारताना फडणवीस यांनी पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरची अट लागू करू नये, अशी स्पष्ट सूचना केली. कर्ज हंगाम सुरू झाला की प्रत्येक जिल्ह्यातून सिबिल स्कोअरच्या तक्रारी येतात. पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट आवश्यक नाही असे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहे. मात्र शाखा मुख्यालयाच्या सूचनांचे कारण देतात. त्यामुळे सर्व बँकांच्या मुख्यालयांनी पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट लागू करू नये, असे स्पष्ट निर्देश द्यावेत. बँकेच्या मुख्यालयातून प्रत्येक शाखांना तसे पत्र पाठवण्यात यावे, अशी सूचना फडणवीस यांनी केली. त्याचवेळी शेतकऱ्यांची सिबिलमुळे अडवणूक झाल्यास कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीची घोषणा ही विधान परिषद निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच केली असल्याने या निवडणूक आचारसंहितेचा कर्जमाफीवर परिणाम होणार नाही. कर्जमाफीबाबत सरकारने घेतलेला निर्णय वेळेत पूर्ण होईल. ३० जूनपूर्वी कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून त्यानंतर शेतकरी नव्या हंगामासाठी कर्जपात्र ठरतील असे फडणवीस यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. तसेच बँकांनी सरकारकडून निधी जमा होण्याची वाट न पाहता पात्र शेतकऱ्यांना तत्काळ कर्ज द्यावे, असे निर्देश देण्यात आल्याचेही फडणवीस सांगितले. राज्यात पतपुरवठा वाढत आहे, मात्र खाते वाढत नाहीत, उलट कमी होत आहेत. ही परिस्थिती धोकादायक असून एसएलबीसीने यावर विशेष लक्ष केंद्रित करुन उपाययोजना तयार करण्याची गरज आहे. २०२२-२३ मध्ये राज्यात ६१.१५ लाख खाती होती. ही संख्या २०२३-२४ मध्ये ५६ लाखांवर आली. २०२४-२५ मध्ये खाती ५४ लाखांवर पोहोचली आणि २०२५-२६ मध्ये ती केवळ ४३ लाखांवर आली आहे. ६१ लाखांवरून ४३ लाखांपर्यंतची घसरण ही अत्यंत गंभीर बाब आहे. नेमके काय चुकत आहे याचा गांभिर्याने विचार करण्याची वेळ आली आहे, असे फडणवीस म्हणाले.

पीक कर्ज वितरणात केवळ सिंधुदुर्ग आणि धुळे या दोन जिल्ह्यांनी ९० ते १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले. रायगड, पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि भंडारा हे जिल्हे ७३ ते ९० टक्क्यांच्या गटात आहेत. तर पालघर, रत्नागिरी, सांगली, नंदुरबार आणि नांदेड या जिल्ह्यांतील कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी असल्याने या भागात विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडेंना अटक

● **पुणे । वीरभूमी –**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना अखेर पोलिसांनी अटक केली आहे. वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात पुणे न्यायालयाने त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

वारकरी संप्रदायात घुसखोरी होत असल्याचा दावा विकास लवांडे यांनी केल्याचा आरोप होता. या वक्तव्याविरोधात नलिनी आशिष वायाळ (वय ४१, रा. येरवडा) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर लवांडे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालयाने यापूर्वी २० मेपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. तसेच तपास अधिकारी, सरकार पक्ष आणि वाघोली पोलिसांना याबाबत भूमिका मांडण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

तपासादरम्यान विकास लवांडे यांनी अटकपूर्व जामिनाच्या अर्जात स्वत:विरोधातील पूर्वी दाखल असलेल्या ४ गुन्ह्यांची माहिती लपविल्याचे समोर आले. सरकारी वकील राजेश कावेडिया यांनी न्यायालयात यावर जोरदार आक्षेप घेत लवांडे यांचे संरक्षण रद्द करण्याची मागणी केली. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द केला. न्यायालयाच्या निर्णयानंतर पोलिसांनी तत्काळ हालचाली करत लवांडे यांना अटक केली.

## सालवडगावात ३१ लाख ३८ हजाराचा मावा पकडला

### शेवगाव पोलिसांची धडाकेबाज कारवाई । मुद्देमालासह दोघांना अटक

● **शेवगाव । वीरभूमी –**
शेवगाव तालुक्यातील सालवडगाव शिवारात अवैधरित्या सुरू असलेल्या सुगंधी तंबाखूपासून मावा निर्मिती कारखान्यावर छापा टाकून तब्बल ३१ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई शेवगाव पोलिसांनी केली असून यामुळे अवैध तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यवयायिकांचे धाबे दणाणले आहेत.




पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार २० मे रोजी शेवगावचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना माहिती मिळाली की, सालवडगाव परिसरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात साठा करून मशीनद्वारे मावा तयार केला जात आहे. माहितीची खातरजमा झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने पथक तयार करून पंचांसमक्ष सालवडगाव शिवारात छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी इम्रान निसार शेख (वय २२) व सोहेल अफ्सर शेख (वय २१) (दोघेही रा. सालवडगाव) यांना ताब्यात घेतले आहे. तसेच छाप्यात मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री, तयार मावा, नागपुरी जाड व बारीक सुपारी, विविध प्रकारचा कच्चा माल, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, बॅटरी, प्लास्टिक ड्रम तसेच महिंद्रा पिकअप व टाटा एसीई (छोटा हत्ती) अशी दोन वाहनासह तब्बल ३१ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# कोपरगाव शहरातील लक्ष्मीनगरसह अन्य भागातील अतिक्रमण नियमानुकूल प्रक्रियेला गती

## शासनस्तरावर पाठपुरावा सुरू : नगराध्यक्ष पराग संधान

● **कोपरगाव । वीरभूमी –**
शहरातील अतिक्रमण नियमानुकूल प्रक्रियेस गती देण्यासाठी कोपरगाव नगरपरिषद सकारात्मक पावले उचलत आहे. जुन्या शासन निर्णयातील कठोर व किचकट अटींमुळे अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेले अनेक नागरिक नियमानुकूल प्रक्रियेत पात्र ठरत नव्हते. मात्र शासनाच्या नवीन धोरणामुळे अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहरातील प्रलंबित अतिक्रमण प्रकरणे नियमानुकूल करण्यासाठी प्रयत्न सुरू असून नागरिकांना न्याय मिळावा यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याची माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली.

कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना लक्ष्मीनगरसह शहरातील अन्य भागांतील अतिक्रमित जागा नियमाकुल करून संबंधित लाभार्थ्यांच्या नावावर सातबारा देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शिर्डीचे प्रांतअधिकारी माणिकराव आहेर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार (दि. २०) रोजी प्रथम बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशासनाकडे मागणी मांडताना नगराध्यक्ष पराग संधान बोलत होते.

महसूल विभाग व महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या नवीन जीआरमध्ये अधिक शिथिलता ठेवून जैसे थे पद्धतीने नियमाकुल प्रक्रिया राबवावी व अनावश्यक अटी लागू करू नयेत, अशी मागणीही नगराध्यक्ष पराग संधान यांनी प्रांत अधिकारी शिर्डी व महसूल प्रशासनाकडे केली. कोपरगाव शहरातील सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने पाठपुरावा सुरू असून महसूल विभागाच्या अंतर्गत सातबारा वाटपाशी संबंधित किचकट अटी कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

लक्ष्मीनगरसह शहरातील अन्य भागांतील अतिक्रमणधारकांना हक्काचे सातबारे मिळावेत यासाठी शासन दरबारी सातत्यपूर्ण मागणी केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, प्रांत अधिकारी माणिक आहेर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की,नवीन शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना कायदेशीर



व प्रशासकीय बाबी अधिक भक्कम होण्यासाठी शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना मागविणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले. त्यामुळे भविष्यात नियमानुकूल प्रक्रिया अधिक स्पष्ट, सुलभ व पारदर्शक पद्धतीने राबविण्यास मदत होणार आहे.या प्रसंगी नगराध्यक्ष पराग संधान, तहसीलदार महेश सावंत, मुख्याधिकारी सुहास जगताप, वनपरिक्षेत्र अधिकारी एम. वाय. शेख, सहाय्यक नगर रचनाकार अश्विनी पिंगळ, नायब तहसीलदार मनोज भुसेकर, हर्षवर्धन सुराळकर, मेश्राम मॅडम आदी उपस्थित होते.

# पार्किंग, अतिक्रमण व स्वच्छतागृहांच्या समस्यांवर व्यापाऱ्यांचा पाथर्डी पालिकेला घेराव

**बाजारपेठ वाचवा, कायमस्वरूपी उपाय करा | नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांकडून तातडीच्या कारवाईचे आश्वासन**

**● पाथर्डी । वीरभूमी –** शहरातील मुख्य बाजारपेठेत चारचाकी व दुचाकी वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करावी, महिला व पुरुषांसाठी मुतारी आणि स्वच्छतागृह उभारावीत तसेच प्रमुख रस्त्यांवरील अनधिकृत फेरीवाले व हातगाड्यांमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी थांबवावी, या प्रमुख मागण्यांसाठी शहरातील व्यापाऱ्यांनी पालिका कार्यालयात धडक देत नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा केली.

व्यापाऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन नगराध्यक्ष अभय आव्हाड आणि मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी दिले.

शहरातील प्रमुख रस्त्यांवर दुकानांसमोर हातगाड्या व अनधिकृत फेरीवाले ठाण मांडून बसत असल्याने ग्राहकांना दुकानांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी वाहतूक कोंडी वाढत असून त्याचा थेट परिणाम व्यापारावर होत आहे. बाजारपेठेत येण्यासाठी रस्ताच उरत नसल्याने बाजारपेठ ओस पडत चालल्याची भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

पेठेकडे येणाऱ्या रस्त्यांच्या तोंडाशीच अस्ताव्यस्त पार्किंग आणि अनधिकृत ठेले लावले जात असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या तिन्ही समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली.

शहरातील चिंचपूर रोड परिसरात अनेक हातगाडे व फळविक्रेते रस्त्यावर व्यवसाय करत असल्याने दुकानदारांना व्यवसाय करणे कठीण झाले आहे. सर्व हातगाडी चालक, फेरीवाले आणि रस्त्यावर बसणाऱ्या व्यावसायिकांना पालिकेने भाजी मार्केट तळात जागा उपलब्ध करून द्यावी तसेच तेथे नियोजित मार्केट उभारावे, अशी मागणी करण्यात आली.

रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी पालिकेने दररोज फिरते अतिक्रमण पथक स्थापन करावे, अशीही मागणी व्यापाऱ्यांनी केली. शहराच्या आर्थिक विकासात व्यापारी वर्ग महत्त्वाची भूमिका बजावतो. मात्र, सध्या आम्हाला गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असून प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे, असे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले.

शहरात वाहनांच्या पार्किंगची मोठी समस्या निर्माण झाली असून विशेषतः नवी पेठ परिसरात वाहनांच्या ये-जा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत. अनेक वाहने रस्त्यावरच उभी राहत असल्याने दुकानदार आणि वाहनचालकांमध्ये वारंवार वाद होत आहेत. त्यामुळे स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारणे अत्यावश्यक असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

नवी पेठेतील ओपन थिएटरचा वापर सुरक्षित वाहनतळ म्हणून करता येऊ शकतो. तसेच शासनाच्या इतर मोकळ्या जागांवरही पार्किंग व्यवस्था उभारल्यास बाजारपेठेतील पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणात सुटू शकते, असे व्यापाऱ्यांनी सुचवले. या परिसरातील स्वच्छतागृह सर्वांसाठी खुले करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली.

पाथर्डी हे तालुक्याचे ठिकाण असल्याने शहरात दररोज विविध कामांसाठी सुमारे १५ ते २० हजार नागरिक आणि महिला येत असतात. मात्र शहरात पुरेशी स्वच्छतागृह व्यवस्था उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. व्यापारी पेठेत तर हा प्रश्न अधिक गंभीर बनला असून व्यापारी आणि ग्राहकांना उघड्यावर किंवा आडोशाचा वापर करावा लागत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.



मुतारी आणि स्वच्छतागृहांच्या प्रश्नावर गेल्या काही वर्षांत अनेक निवडणुका झाल्या, मात्र लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या समस्येचे निराकरण करण्यात अपयशी ठरल्याची टीका व्यापाऱ्यांनी केली. शहरातील विविध भागांत सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या बैठकीला व्यापारी सतीश गुगळे, राजेंद्र शेवाळे, सागर दराडे, बाळासाहेब जिरेसाळ, संतोष जिरेसाळ, डॉ. सुहास उरणकर, प्रताप तांदळे, चंदन कुचेरिया, प्रितेश पटवा, बाळासाहेब इजारे, संजय बाहेती, संजय पारखे, दिलीप गटागट, आंबादास जाधव, संतोष डागा, प्रशांत शेळके यांच्यासह बहुसंख्य व्यापारी उपस्थित होते.

नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगलताई कोकाटे, नगरसेवक अमोल गर्जे आणि अजय भंडारी यांनी व्यापाऱ्यांशी चर्चा केली. व्यापाऱ्यांच्या भावना अतिशय तीव्र होत्या. मुख्याधिकारी पालिकेत येत नाहीत, तोपर्यंत आम्ही येथेच बसून राहू, अशी भूमिका व्यापाऱ्यांनी घेतली.

यानंतर मुख्याधिकारी संतोष लांडगे पालिका कार्यालयात आले. त्यांनी व्यापाऱ्यांच्या अडचणी समजून घेत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. पोलिस बंदोबस्तासह शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्यात येतील. तसेच इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगराध्यक्ष आणि पालिका पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य तो तोडगा काढला जाईल, असे लांडगे यांनी सांगितले.

## हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीच्या कार्तिक करांडेची महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** जिल्ह्यातील हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीचा प्रतिभावान क्रिकेटपटू कार्तिक वैभव करांडे याची DCCI (डिफरंटली एबल्ड क्रिकेट कौन्सिल ऑफ इंडिया) आयोजित पाचव्या एलिट फिजिकल डिसेब्लिटी टी२० चॅम्पियनशीप २०२६ साठी महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड झाली आहे. कार्तिकच्या या निवडीमुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



बंगळुरू येथे १७ मे ते २७ मे या कालावधीत होणाऱ्या डीसीसीआयच्या खुल्या वयोगटातील मुलांच्या प्रतिष्ठेच्या टी२० क्रिकेट स्पर्धेत कार्तिक महाराष्ट्र राज्य डिसेब्लिटी क्रिकेट संघाचे तो प्रतिनिधित्व करणार आहे. देशभरातील विविध राज्यांतील गुणवंत खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असल्याने ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अशा दर्जेदार स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात स्थान मिळवणे हे कार्तिकच्या मेहनतीचे व गुणवत्तेचे मोठे यश आहे.

कार्तिक हा उजव्या हाताचा आक्रमक फलंदाज असून डावखुरा फिरकी गोलंदाज म्हणूनही त्याने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. मैदानावरील त्याचा आत्मविश्वास, सातत्यपूर्ण सराव आणि संघासाठी खेळण्याची जिद्द यामुळे त्याने अल्पावधीतच प्रशिक्षक आणि निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. यापूर्वीही त्याने १४ व १६ वर्षांखालील मुलांच्या महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघटनेच्या आमंत्रित क्रिकेट स्पर्धेत विजय क्लब, पुणे संघाचे प्रतिनिधित्व करून उल्लेखनीय कामगिरी बजावली होती.

नियमित सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि खेळावरील निष्ठा यामुळे त्याने प्रगती साधली आहे. तो सध्या अहिल्यानगर येथील हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये प्रशिक्षक सरफराज बांगडीवाला यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. कार्तिकच्या या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप, हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक वसीम हुंडेकरी यांच्यासह क्रीडा प्रेमींनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## श्री साईबाबांच्या कृपेने पूर्ण झाला वासुदेव शिंदे यांचा सहा वर्षांचा संकल्प

**आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या उपस्थितीत वासुदेव शिंदे यांच्यात अनवाणी पायात पुन्हा चप्पल**

**● कोपरगाव । वीरभूमी–** शिर्डीच्या साईबाबांच्या कृपेने २०२६ मध्ये विवेकभैय्या कोल्हे यांना विधान परिषदेत आमदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि वासुदेव शिंदे यांचा सहा वर्षांचा संकल्प पूर्णत्वास गेला. यानिमित्ताने शिर्डीच्या पावन भूमीत त्यांनी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या उपस्थितीत शिंदे यांनी पुन्हा चप्पल घातली. २०१९ मध्ये मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांचा अल्पशा मतांनी पराभव झाला तेव्हापासून कोल्हे कुटुंबातील सदस्य आमदार होत नाही तोवर चप्पल घालणार नाही हा संकल्प केला होता.



आ. विवेकभैय्या कोल्हे यांचे सहकारी वासुदेव शिंदे यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर जोपर्यंत कोल्हे परिवारातील व्यक्ती आमदार होत नाही, तोपर्यंत पायात पादत्राणे घालणार नाही, असा कठोर संकल्प श्री साईबाबांच्या चरणी केला होता. त्या संकल्पासाठी वासुदेव शिंदे यांनी तब्बल सहा वर्षे अनवाणी राहून आपली श्रद्धा आणि निष्ठा जपली.

महाराष्ट्र विधान परिषदेमध्ये आमदार म्हणून नियुक्त झाल्यानंतर दि. २१ मे रोजी प्रथमच गुरुवारच्या पवित्र दिवशी युवानेते आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी रेणुकाताई कोल्हे यांच्या समवेत शिर्डी येथे उपस्थित राहून श्री साईबाबांचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. श्री साईबाबा संस्थानचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी संस्थानच्या वतीने आ. कोल्हे यांचा सत्कार केला. यावेळी आ. कोल्हे म्हणाले की, आज आमदार म्हणून बाबांच्या दरबारी उपस्थित राहताना मन अत्यंत भावूक झाले आहे. पुढील सहा वर्षांसाठी जनसेवेची संधी मिळाली असून सर्वसामान्यांच्या सेवेसाठी ताकद, प्रेरणा आणि आशीर्वाद घेण्यासाठीच सपत्नीक शिर्डीत आलो आहे. श्री साईबाबांचा आशीर्वाद, जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांचे निः स्वार्थ प्रेम हीच माझ्या सार्वजनिक जीवनातील खरी ताकद आहे. याच प्रेरणेने पुढील काळात जनसेवेचे कार्य अधिक जोमाने करण्याचा संकल्प करीत आहे.

या प्रसंगी रेणुकाताई कोल्हे, माजी नगराध्यक्ष शिवाजीराव गोंदकर, गजानन शर्वेकर, सचिन शिंदे, सचिन तांबे, सचिन भणगे, चेतन कोते, रमेश शेळके, नरेश सुराणा, रमेश बिडये, राधाकिसन शेटे, गणेश जाधव, आकाश त्रिपाठी, सचिन वाघ आदीसह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांनी आर्थिक स्वावलंबी होवून कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीत योगदान द्यावे

**सौ.पुष्पाताई काळे | महिलांना ब्युटी पार्लर प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि मेकअप कीटचे मोफत वाटप**

**● कोपरगाव । वीरभूमी–** आजच्या वाढत्या महागाईच्या काळात केवळ एका व्यक्तीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा गाडा चालविणे कठीण झाले आहे. मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि भविष्यातील गरजा पूर्ण करतांना अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे महिलांनीही स्वावलंबी बनून कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीत योगदान द्यावे असे प्रतिपादन प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. पुष्पाताई काळे यांनी केले.

महिला व बालविकास विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण आदिवासी भागातील महिला व युवतींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण अंतर्गत कोपरगाव मतदार संघातील अनेक महिलांनी ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेतले असून या महिलांना बुधवार (दि.२०) रोजी कोपरगाव येथे प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा व गौतम सहकारी बँकेच्या माजी संचालिका सौ. पुष्पाताई काळे यांच्या हस्ते ब्युटी पार्लर प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि मोफत मेकअप कीटचे वाटप करण्यात आले याप्रसंगी त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि, पती-पत्नी हे संसाररूपी रथाची दोन चाके असून दोघांनीही एकमेकांना साथ दिल्यास कुटुंब अधिक सक्षम होते. महिलांनी कौशल्याधारित प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे ही काळाची गरज आहे. अशा प्रशिक्षणांमुळे महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत असून त्यांच्या आत्मविश्वासातही मोठी वाढ होत आहे.ग्रामीण भागातील महिलांनी केवळ चूल आणि मूल यामध्ये अडकून न पडता आत्मनिर्भर व स्वावलंबी बनावे आणि स्वतः च्या कौशल्याच्या जोरावर आर्थिक प्रगती साधावी यासाठी आ.आशुतोष काळे यांच्या सहकार्यातून प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळ सातत्याने विविध उपक्रम राबवीत आले आहे. यापूर्वी महिलांना नथ आणि ज्वेलरी तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले असून त्या प्रशिक्षणासाला महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळाला होता. आजच्या काळात ब्युटीपार्लर हा महिलांसाठी एक भक्कम उत्पन्नाचा मार्ग बनू शकतो. कष्ट आणि जिद्द असेल तर यश नक्की मिळते कारण कष्टाला दुसरा कोणताही पर्याय नाही. पार्लर चालवताना केवळ एकाच गोष्टीवर अवलंबून न राहता त्यात ज्वेलरीचे विविध प्रकार आणि वेगवेगळे कपडे विक्रीसाठी ठेवून महिला आपले उत्पन्न अधिक वाढवू शकतात. या व्यवसाया संदर्भात महिलांना जी काही मदत लागेल ती सर्व मदत करायला आम्ही तयार आहोत. कच्चा माल खरेदी करण्यापासून ते तयार उत्पादनांच्या विक्रीपर्यंत सर्वोतोपरी मदत केली जाईल. पार्लर चालवतांना आपली संस्कृती जपण्याचे काम करा एखाद्या महिलेने पाश्चात्त्य किंवा वेगळी स्टाईल करायला सांगितली तर त्यांना ही स्टाईल आता जुनी झाल्याचे सांगून आपली संस्कृती आणि परंपरा जपण्याचा प्रयत्न करा असा मौलिक सल्ला त्यांनी यावेळी महिलांना दिला.




आपल्या मुलांना चांगले संस्कार आणि चांगले शिक्षण द्या. चांगला हिरा कुठेही चमकतो त्यासाठी मराठी किंवा इंग्रजी माध्यम महत्त्वाचे नसून उत्कृष्ट शिक्षक लाभले तर मुले नक्कीच चांगली घडतात. मराठी माध्यम आणि रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत शिकणारे हजारो विद्यार्थी आज देश-विदेशात मोठे अधिकारी, डॉक्टर आणि इंजिनिअर झाले आहेत. त्यामुळे मातृभाषेतून घेतलेले शिक्षण कधीही वाया जात नाही. ज्या महिलांचे शिक्षण काही कारणास्तव अपूर्ण राहिले आहे,त्यांनी आपल्या मुलांसोबत आपले शिक्षण पूर्ण करावे. शिक्षणाचे वय कधीही संपत नाही त्यामुळे स्वतःला आयुष्यभर विद्यार्थी समजा आणि सतत नवीन गोष्टी शिकत राहून आपल्या पतीला संसारात खंबीर साथ द्या. आमदार आशुतोष काळे आणि सौ. चैतालीताई काळे यांच्या माध्यमातून मी तुम्हाला मदत करायला नेहमी तयार असल्याचे सौ.पुष्पाताई काळे यांनी यावेळी सांगितले. यावेळी धनसंपदा बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. अनिता वहाडणे, नगरसेविका सौ. माधवी वाकचौरे, सौ.सोनल त्रिभुवन, माजी नगरसेविका श्रीम.वर्षा गंगुले आदी मान्यवरांसह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

SPOT NEWS

## दत्तात्रय आभाळे यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

येथील शालेय शिक्षक दत्तात्रय पांडुरंग आभाळे यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. नाशिक येथील ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव केला जाणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. २३ मे रोजी सायंकाळी ४ वाजता नाशिक येथील वावरेनगर, कामटवाडे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास रिपब्लिकन सेनेचे ड. अमन आंबेडकर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंतू), नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, समाजकल्याण विभागाचे उपायुक्त भगवान वीर, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, रिपब्लिकन सेनेचे राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे तसेच मनपा सहाय्यक उपायुक्त नानासाहेब साळवे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले आणि सचिव मिलिंद कळवणकर यांनी दिली.

## कौटुंबिक वादाच्या सुनावणीसाठी नगरमध्ये आलेल्या व्यक्तीवर जीवघेणा हल्ला

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

न्यायप्रविष्ट असलेल्या कौटुंबिक वादाच्या न्यायालयीन कामासाठी अहिल्यानगर शहरात आलेल्या वाशी, नवी मुंबई येथील अजीज अहमद बेग खान यांच्यावर कथितरीत्या जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, अन्यथा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा अजीज खान यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी त्यांनी केली आहे. अजीज अहमद बेग खान यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांची सासरवाडी अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरात असून, कौटुंबिक वादासंदर्भातील प्रकरण सध्या नगर न्यायालयात सुरू आहे. संबंधित प्रकरणाच्या सुनावणीसाठी ते नगरमध्ये आले असताना त्यांच्यावर काही व्यक्तींनी अचानक हल्ला करून गंभीर मारहाण केली.

# तहानलेल्या सावरगावसह वाड्या-वस्त्यांना सचिन गोडसेंचा आधार

### मोफत टँकर सेवेतून जपली सामाजिक बांधिलकी । दुष्काळी भागातील नागरिकांना मोठा दिलासा

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील सावरगाव आणि परिसर हा दुष्काळी पट्टा म्हणून ओळखला जातो. उन्हाळ्याची तीव्रता वाढली की डोंगरदऱ्यांमध्ये वसलेल्या वाड्या–वस्त्यांवर पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. हीच समस्या ओळखून सावरगावचे सुपुत्र आणि सध्या मुंबई येथे उद्योजक म्हणून कार्यरत असलेले धर्मवीर शंभूराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सचिन गोडसे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मोफत टँकर सेवेचा उपक्रम सुरू ठेवला आहे. त्यांच्या या जनहितार्थ कार्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.



सावरगावसह काळेवाडी, चिकणेवाडी, मानेवाडी, गोडसेवाडी, लांडगेवाडी आणि चिकणे झाप या विखुरलेल्या वस्त्यांवर उन्हाळ्यात पाण्यासाठी महिलांना मोठी पायपीट करावी लागते. शासकीय टँकर मंजुरीची प्रक्रिया वेळखाऊ ठरत असल्याने नागरिकांचे हाल होतात. मात्र, सचिन गोडसे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण होते, तेथून केवळ एक फोन आला की अवघ्या एका तासात पाण्याचा टँकर संबंधित वस्तीवर पोहोचतो.

त्यांच्या या तत्परतेमुळे आणि निस्वार्थ सामाजिक भावनेमुळे ग्रामीण भागात सचिन गोडसे यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. दुष्काळी परिस्थितीत नागरिकांच्या मदतीला धावून जाणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जिजाभाऊ चिकणे, बाळासाहेब शिरतार, सामाजिक कार्यकर्ते रामदास साळवे, गंगाराम चिकणे, हरिभाऊ साळवे, प्रथमेश साळवे, अविनाश थोरात, सुदर्शन बेलकर आणि ऋषिकेश गोडसे यांचेही मोलाचे सहकार्य लाभत आहे.

माणूस कितीही मोठा झाला तरी आपल्या मातीचे ऋण विसरता येत नाही, हे सचिन गोडसे यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली असून संपूर्ण तालुक्यात त्यांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे.

## नेप्ती परिसरात भर उन्हात शिक्षकांची जनगणनेसाठी पायपीट; नागरिकांचा प्रतिसाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नगर तालुक्यातील नेप्ती व परिसरातील निमगाव वाघा, हिंगणगाव, हमीदपूर, जखणगाव आदी भागात भारतीय जनगणना २०२७ नुसार १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ अखेर महाराष्ट्रात घरयादी व घरगणना करण्याचे आदेशित करण्यात आले असून त्यानुसार प्रत्यक्ष जनगणना मोहिमेला सुरुवात झाली आहे. नेप्ती व परिसरातही जनगणना कार्य उत्साही वातावरणात सुरू असून ग्रामस्थांकडून या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

भर उन्हात शिक्षकांनी घरोघरी जाऊन नागरिकांची माहिती संकलित करण्याचे काम अत्यंत प्रामाणिकपणे सुरू ठेवले आहे. गावातील नागरिक शिक्षकांना सहकार्य करत असून अनेक ठिकाणी चहा, पाणी व अल्पोपहाराची व्यवस्था करून त्यांचे स्वागत करत आहेत अशी माहिती रामदास फुले यांनी दिली. नेप्ती येथील प्रगणक यादी गट क्र. २६१ मध्ये जनगणना प्रगणक शिक्षक श्री बाळासाहेब भाऊसाहेब कड व संभाजी कांडेकर सर यांनी प्रत्येक घरोघरी जाऊन जनगणनेतील ३४ प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली.

## संशयास्पद 'विशारद' प्रमाणपत्रांवरून प्राथमिक शिक्षकांवर कारवाईची आरपीआयची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या शिक्षण विभागात संशयास्पद पदवी प्रमाणपत्रांच्या आधारे पदोन्नती मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. प्रयाग अलाहाबाद संस्थेकडून हिंदी विषयात देण्यात आलेल्या विशारद पदवीच्या प्रमाणपत्रांचा वापर करून काही शिक्षकांनी पदोन्नती व बदलीचे लाभ मिळविण्याचा प्रयत्न केल्याची बाब समोर आल्याने संबंधितांची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आरपीआयचे युवक कार्याध्यक्ष अजय बडोदे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की शिक्षण विभागामध्ये विविध अनियमितता व अनागोंदी कारभार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही शिक्षकांकडून संशयास्पद अथवा खोट्या पदवी प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न केला जात असल्याने शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात येत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. निवेदनानुसार, ऑक्टोबर २०२३ मध्ये पार पडलेल्या केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेदरम्यान जवळपास ८ ते १० मुख्याध्यापकांनी प्रयाग अलाहाबाद संस्थेचे डी.एड. समकक्ष अथवा बी.एड. संबंधित प्रमाणपत्रे जोडून पदोन्नतीचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, याबाबत शंका उपस्थित झाल्यानंतर संबंधित प्रमाणपत्रधारक शिक्षकांनी तात्काळ माघार घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# स्टार्ट-अप आणि उद्योजकीय ऊर्जेचा प्रभावी वापर करत ठसा उमटवणाऱ्या एस्सेल समूहाची १०० वर्षे पूर्ण

### विविध क्षेत्रात १० दशलक्षांहून अधिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करून राष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

बहुआयामी भारतीय व्यावसायिक समूह एस्सेल ग्रुपने गौरवशाली १०० वर्षे पूर्ण करून आपल्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. १९२६ मध्ये आदमपूर नावाच्या एका छोट्या शहरात झालेल्या सुरुवातीपासून ते विविध व्यवसायांमध्ये विस्तारलेल्या बहुआयामी समूहापर्यंत, एस्सेल ग्रुपने जगभरात एक कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे.

१९६७ पासून, एस्सेल ग्रुपने एका पारंपरिक व्यवसायातून स्टार्ट–अपमध्ये स्वतःला रूपांतरित करत जागतिक समूहामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आणि स्वतःला नव्याने घडवले आहे. ग्रुपच्या मुळातील पारंपरिक वस्तूंच्या व्यापाराचा व्यवसाय लष्करी पुरवठा आणि सीमेपलीकडील व्यापाराकडे वळवण्यात आला. विशेष म्हणजे, अनेक व्यवसायांची सुरुवात ही या ग्रुपने केली असून, उद्योगातील अनेक गोष्टींची सुरुवात ही त्यांच्या नावावर आहे. महत्त्वाचे म्हणजे आपली स्टार्ट–अप मानसिकता जोपासत आणि नफ्यावर बारकाईने लक्ष केंद्रित करत, ज्या व्यवसायांनी अपेक्षित मूल्य–वितरणाची पातळी गाठली नाही, असे काही व्यवसाय बंद करण्यास ग्रुपने कधीही मागेपुढे पाहिले नाही.

स्व. राम गोपालजी यांनी स्थापन केलेला, त्यांचे सुपुत्र श्री जगन्नाथ जी गोएंका यांनी विस्तार केलेल्या या व्यवसायाला श्री. नंदकिशोर जी यांनी भक्कम पाठिंबा दिला. दूरदृष्टी लाभलेल्या डॉ. सुभाष चंद्र आणि त्यांचे बंधू – लक्ष्मीनारायण, जवाहर आणि अशोक गोयल यांनी यशस्वीपणे नेतृत्व केलेला एस्सेल ग्रुप हा मोजक्याच भारतीय व्यावसायिक समूहांपैकी एक आहे, जो आपली समृद्ध परंपरा सहाव्या पिढीकडे यशस्वीपणे हस्तांतरित करत आहे – आणि विशेष म्हणजे, या समूहाची चौथी आणि पाचवी पिढी आजही सक्रिय आहे.

गेल्या शतकादरम्यान, या समूहाने पॅकेजिंग, गृह मनोरंजन, मनोरंजन उद्याने, वृत्तसेवा, आशय वितरण, पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता, शिक्षण, तंत्रज्ञान, जीवनशैली आणि अशा विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये आपला विस्तार केला; ज्यामुळे १९० हून अधिक देशांमधील अब्जावधी लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला आहे. केवळ उदारीकरणापूर्वीच्या काळात भारतीय व्यावसायिक क्षेत्राची उभारणी करण्यातच या समूहाने योगदान दिले नाही, तर देशाचे भौतिक सामर्थ्य आणि सॉफ्ट पॉवर म्हणजेच सांस्कृतिक व सामाजिक प्रभाव लक्षणीयरीत्या वाढवून देशाच्या आर्थिक विकासालाही बळकटी दिली आहे. केवळ काही कंपन्याच नव्हे, तर संपूर्ण उद्योगक्षेत्रे उभी करणाऱ्या आपल्या पथदर्शी उपक्रमांच्या माध्यमातून, एस्सेल समूहाने आपल्या शतकातील वाटचालीचा ठसा उमटवला आहे; आणि या प्रक्रियेत त्यांनी देशभरातील १ कोटींहून अधिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत.

या विशेष प्रसंगी डॉ. सुभाष चंद्र म्हणाले, एस्सेल ग्रुपचा प्रवास हा चिकाटी, लवचिकता, नावीन्य आणि प्रगतीचा राहिला आहे. व्यावसायिक प्रगती ही समाजासाठी आणि राष्ट्रासाठी मूल्यवर्धक ठरली पाहिजे, या आमच्या विश्वासानेच ग्रुपने व्यवसायाच्या प्रत्येक क्षेत्रात उचललेल्या महत्त्वपूर्ण पावलांना मार्गदर्शन केले आहे. मला आणि माझ्या बंधूंना १०० वर्षांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करताना अत्यंत अभिमान वाटतो. पिढ्यानपिढ्यांची दूरदृष्टी आणि अज्ञात क्षेत्रात पाऊल ठेवण्याच्या धैर्यातूनच हा टप्पा उभारला गेला आहे, ज्यामुळे जवळपास प्रत्येक उद्योगच खऱ्या अर्थाने शतकपूर्तीचा ठसा उमटवतो आहे. आपल्या राष्ट्रासोबतच एस्सेल ग्रुपचा विकास झाला आहे आणि मला हे सांगताना अभिमान वाटतो की, आपण सर्वांनी मिळून आर्थिक मूल्य निर्माण केले आहे आणि राष्ट्रीय प्रगतीला चालना देण्यासाठी सामाजिक परिवर्तन सक्षम केले आहे.

हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करत, डॉ. चंद्रा यांनी आज आयोजित केलेल्या एका विशेष टाऊनहॉलमध्ये एस्सेल ग्रुपच्या जगभरातील १०,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना संबोधित केले. या अत्यंत अनौपचारिक वातावरणात डॉ. चंद्रा यांनी ग्रुपच्या ऐतिहासिक प्रवासावर प्रकाश टाकला आणि हा समृद्ध वारसा पुढे नेण्यात तसेच व्यवसाय भक्कमरित्या उभारण्यात कर्मचाऱ्यांनी बजावलेल्या मोलाच्या भूमिकेची दखल घेतली. आपल्या भाषणात, डॉ. चंद्रा यांनी ग्रुपने आपल्या उत्पादनांच्या माध्यमातून जगभरात व्यापक सकारात्मक प्रभाव निर्माण करण्यात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. अनेक दशकांपासून ग्रुपच्या प्रवासाचा भाग असलेल्या कर्मचाऱ्यांनी सांगितलेल्या हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी कथाही त्यांनी सांगितल्या. भारतातील पहिली स्टार्टअप कंपनी म्हणून, एस्सेल ग्रुप भविष्यासाठी नवनवीन शोध लावत आणि धाडसी पावले उचलत असल्याचा पुनरुच्चार डॉ. चंद्रा यांनी केला. तसेच, पुढील शतकाचे निर्माते म्हणून उद्योजकतेची भावना जोपासण्याचे आवाहन त्यांनी कर्मचाऱ्यांना केले.

गेल्या १०० वर्षांत, या समूहाच्या योगदानाने भारताच्या आर्थिक आणि सामाजिक पटलावर एक अमिट ठसा उमटवला आहे.

नव्याने सुरुवात केलेल्या काही उपक्रमांच्या माध्यमातून, या समूहाने राष्ट्रनिर्मितीचा एक भक्कम पाया रचला आहे.

**नावीन्यपूर्ण पॅकेजिंग तंत्रज्ञानाची भारतात सुरुवात** : एस्सेल प्रोपॅकच्या माध्यमातून एस्सेल समूहाने भारतात ग्राहक–वस्तूंच्या आधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञानाचा परिचय करून दिला. या कंपनीने सर्वप्रथम लॅमिनेटेड प्लास्टिक ट्यूब तंत्रज्ञानाचा अवलंब केला; ज्यामुळे पाचही खंडांमध्ये उत्पादन प्रकल्प उभारून, जगातील सर्वात मोठी लॅमिनेटेड ट्यूब उत्पादक कंपनी म्हणून तिला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि ती भारताची पहिली बहुराष्ट्रीय कंपनी ठरली. जोपर्यंत ही कंपनी एस्सेल समूहाचा भाग होती, तोपर्यंत या कंपनीने उत्पादित केलेल्या ट्यूब्सचा वापर जगातील एक तृतीयांश लोकसंख्या दात घासताना करत असे.

**सामूहिक मनोरंजनाच्या अनुभवाच्या गरजेची जाणीव** :लोकांना एकत्र आणणाऱ्या आणि अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित करणाऱ्या, सामूहिक मनोरंजनाच्या अनुभवांची वाढती पण अपूर्ण राहिलेली गरज ओळखून, या समूहाने आशियातील सर्वात मोठे अम्युझमेंट पार्क –एस्सेल वर्ल्ड सुरू केले. या उद्यानाने संपूर्ण आशिया खंडातील मोकळा वेळ घालवण्याची आणि पर्यटन अनुभवांची संकल्पना नव्याने परिभाषित केली. तसेच पायाभूत सुविधा, पर्यटन आणि आतिथ्य या क्षेत्रांना गती देऊन, राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देण्यास त्यांना सक्षम केले.

**भारतातील लहान मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राचे एका उद्योगात रूपांतर करून आणि त्याला आयटी क्षेत्रानंतर दुसरे सर्वात मोठे रोजगार देणारे क्षेत्र बनवणे** : १९९२ मध्ये देशातील पहिले खासगी सॅटेलाइट टेलिव्हिजन चॅनल – झी टीव्हीची स्थापना करून एस्सेल ग्रुपने भारतीय मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राच्या परिवर्तनाची सुरुवात केली; त्यानंतर १९९५ मध्ये भारतातील पहिली खासगी वृत्तवाहिनी – झी न्यूज सुरू केली. या अग्रगण्य प्रयत्नांमुळे माहिती आणि मनोरंजनाची उपलब्धता सर्वांसाठी सुलभ झाली, आणि समृद्ध परंपरा तसेच मूल्यांनी युक्त भारतीय मनोरंजन जगभरात पोहोचले, ज्यामुळे भारताचे जागतिक नकाशावर भक्कम स्थान निर्माण झाले. या ग्रुपने सामग्री निर्मिती, जाहिरात, वितरण, निर्मिती, इमर्सिव्ह इन्फोटेनमेंट (मनोरंजक माहिती आणि मनोरंजन) या क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व संधी निर्माण केल्या आणि वापराच्या नव्या डिजिटल पद्धती विकसित केल्या.

या ग्रुपने पुढे या क्षेत्रात गुंतवणूक करून सिटी केबल आणि डिश टीव्हीच्या माध्यमातून एक यशस्वी वितरण व्यवसाय स्थापित केला, ज्यामुळे घरोघरी सामग्री पोहोचवण्याच्या पद्धतींमध्ये क्रांती घडली आहे. ग्रुपने उचललेल्या पावलांमुळे भारतीय मीडिया आणि मनोरंजन उद्योग उदयोन्मुख बाजारपेठांमधील गुंतवणूकदारांसाठी सर्वात आकर्षक क्षेत्रांपैकी एक बनला आहे आणि हे क्षेत्र चार दशके पूर्ण करण्याच्या जवळ पोहोचत असतानाही लक्षणीय थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करत आहे.

**दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढीचे संगोपन** : देशाचे भविष्य घडवण्यासाठी शिक्षण हे सर्वात शक्तिशाली साधन आहे, या विश्वासाने प्रेरित होऊन, ग्रुपने 'झी लर्न'च्या माध्यमातून वाढत्या निमशहरी आणि ग्रामीण लोकसंख्येला परवडणारे आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. भावी पिढ्यांचे संगोपन करण्यासाठी, ग्रुपच्या २५०० हून अधिक 'किडझी' ब्रँडेड प्री–स्कूल्स आहेत, ही आशियातील सर्वात मोठी साखळी ठरली आहे आणि ती लाखो मुलांच्या जीवनावर प्रभाव टाकते. यासोबतच, तरुणांच्या अद्वितीय कौशल्यांचे संगोपन करणाऱ्या के–१२ शाळा आणि उच्च शिक्षण संस्थाही आहेत. भारतातील शिक्षण क्षेत्रात जवळपास १५ दशलक्ष लोकांना रोजगार मिळतो, ज्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी नवनवीन संधी निर्माण होतात.

**शहरी आधुनिकीकरणाच्या पायाभूत सुविधांची उभारणी** : राष्ट्र उभारणीत योगदान देणाऱ्या महत्त्वपूर्ण शहरी पायाभूत सुविधांच्या उभारणीत एस्सेल ग्रुपच्या पायाभूत सुविधा व्यवसायाने मोठे योगदान दिले. राज्य आणि राष्ट्रीय महामार्ग, शहरी जल व्यवस्थापन प्रणाली ते वीज वितरण नेटवर्कपर्यंत, या ग्रुपने अनेक राज्यांमध्ये कनेक्टिव्हिटी तसेच राहणीमानाचा दर्जा सुधारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे मोठ्या आर्थिक विकासाला चालना मिळाली.

**राष्ट्र विकासाच्या पुढील टप्प्याला अर्थसाहाय्य** : या ग्रुपसाठी यशाचा अर्थ केवळ नफा नाही तर नफ्याच्या पलीकडे जाऊन, आपल्यासारख्याच उद्योजकांसाठी संधी निर्माण करून संपूर्ण उद्योग उभारणे हा आहे. एस्सेल फायनान्सच्या माध्यमातून, या ग्रुपने लघु आणि मध्यम उद्योगांना वित्तीय सेवा पुरवून आणि देशभरातील कंपन्यांना पाठिंबा देण्यासाठी सुरक्षित कर्ज आणि क्रेडिट लाइन्स उपलब्ध करून देऊन भारतीय अर्थव्यवस्थेत योगदान दिले.

**समूहाचे सामाजिक भान** : विविध समुदायांमध्ये सकारात्मक सामाजिक–सांस्कृतिक प्रभाव निर्माण करण्याच्या उद्देशाने अनेक सामाजिक उपक्रम हाती घेऊन, या समूहाने व्यवसायाच्या पलीकडे जात महत्त्वपूर्ण मूल्यनिर्मिती केली आहे. 'एकल विद्यालय', 'ग्लोबल विपश्यना फाउंडेशन' आणि 'सुभाषचंद्र फाउंडेशन' यांनी समाजासाठी दिलेले योगदान हे समाजात चिरस्थायी आणि सकारात्मक प्रभाव निर्माण करण्याच्या समूहाच्या कटिबद्धतेचे ठाम प्रतिबिंब आहे. देशभरातील शेकडो गावांमध्ये ग्रामीण युवक आणि महिलांना सक्षम करण्याचे कार्य 'सुभाषचंद्र फाउंडेशन' अविरतपणे करत आहे.

भारतातील युवकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या सुभाषचंद्र मोटिव्हेशनल शो व्यतिरिक्त, भविष्यासाठी आणखीही अनेक सामाजिक उपक्रम नियोजित आहेत.

**एस्सेल ग्रुपची भविष्यातील १०० वर्षे** : भारताचा स्वतःचा स्टार्टअप म्हणून, एस्सेल ग्रुप नवीन व्यवसाय क्षेत्रांमध्ये विस्तार करून आणि कंटेंट, तंत्रज्ञान तसेच डिजिटल क्षेत्रात वाढीव क्षमतांसह भविष्यासाठी उभारणी करून आपल्या उद्योजकतेचा विस्तार करते आहे. तंत्रज्ञान हे ग्रुपसाठी मुख्य लक्ष्य क्षेत्र असेल, ज्याद्वारे सध्याच्या व्यवसायांसाठी त्याच्या खऱ्या क्षमतेचा अधिक उपयोग केला जाईल. सर्वसमावेशक, भविष्यासाठी सज्ज असे प्लॅटफॉर्म ग्रुप तयार करत आहे, ज्यात लोकांचा सहभाग असेल, तो टिकवून ठेवला जाईल आणि त्याचे दीर्घकालीन मूल्यात रूपांतर करू शकतील, तसेच अटेंशन इकॉनॉमीमध्ये एक महत्त्वपूर्ण वाटा मिळवू शकतील. ग्रुपचा भविष्यासाठीचा दृष्टिकोन भारताच्या विकासाच्या महत्त्वाकांक्षेशी पूर्णपणे जुळलेला आहे, ज्याद्वारे नावीन्यपूर्णतेला चालना देणे आणि अशा संधी निर्माण करणे अपेक्षित आहे, ज्या जागतिक नकाशावर राष्ट्राच्या आर्थिक आणि सांस्कृतिक उत्क्रांतीचा पुढील टप्पा निश्चित करतील.

# शिर्डीत २३ व २४ मे रोजी संरक्षण उत्पादनांचे भव्य प्रदर्शन

## विद्यार्थी व नागरिकांना रॉकेट, क्षेपणास्त्रे आणि आधुनिक संरक्षण तंत्रज्ञान पाहण्याची संधी

**शिर्डी । वीरभूमी-**

शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटनानिमित्त २३ आणि २४ मे २०२६ रोजी विद्यार्थी व नागरिकांसाठी संरक्षण साहित्य उत्पादनाचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये रॉकेट आणि क्षेपणास्त्रे हे विशेष आकर्षण ठरणार आहेत.

देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते सावळीविहीर येथील औद्योगिक वसाहतीमधील निबे ग्रुपच्या संरक्षण उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच कार्यान्वित होत असलेल्या या प्रकल्पामुळे भविष्यात जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून ओळखला जाणार आहे. या प्रकल्पात १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार असून, दरवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता या कारखान्याची आहे. विशेष म्हणजे संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान आणि कच्चा माल स्वदेशी आहे. हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे २०० एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन तसेच विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधांचा समावेश आहे.

उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या तसेच शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. यासाठी प्रकल्पस्थळी मोठे स्टॉल उभारण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, विज्ञानप्रेमी नागरिक तसेच महिलांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. तरुणांना संरक्षण क्षेत्रातील रोजगार व करिअरच्या संधी जाणून घेण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.







अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के. के. रेंजेस आणि मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रात विशेष महत्त्व आहे. आता नव्या संरक्षण उत्पादन प्रकल्पामुळे या ओळखीला आणखी बळ मिळणार आहे.

# चिखलीत मातृप्रेमातून १६३ जेष्ठांचा सन्मान

## लिलाबाई झेंडे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त रामदास झेंडे मित्रमंडळाचा प्रेरणादायी उपक्रम

**श्रीगोंदा । वीरभूमी-**

मातृप्रेम, संस्कार आणि समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सुंदर आदर्श चिखली येथे पाहायला मिळाला. रामदास झेंडे मित्रमंडळाच्या वतीने माता लिलाबाई झेंडे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध जाती-धर्मातील वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या तब्बल १६३ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. आयुष्यभर संघर्ष करून कुटुंबाला उभारी देणाऱ्या मातृशक्तीच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.



या सोहळ्यात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोसले तसेच सोपानराव मुळे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. पांडुरंग क्षीरसागर महाराज, बाळासाहेब नाहाटा आणि राजेंद्र म्हस्के यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गा तांबे तसेच ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मणराव ढोबळे यांनी शुभेच्छा संदेशाद्वारे उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटीलकाका महाराज होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले, आजची पिढी शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने परदेशात जात असताना अनेक आई-वडिलांना वृद्धाश्रमाचा आधार घ्यावा लागतो. अशा काळात रामदास झेंडे मित्रमंडळाने ज्येष्ठांचा सन्मान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांप्रती प्रेम, आदर आणि जिव्हाळा जपला पाहिजे.

माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोसले म्हणाले, चिखलीकरांनी माझ्या राजकीय प्रवासाला नेहमीच मताधिक्य आणि विचारांची ताकद दिली. राजकीय संन्यासानंतर याच भूमीत झालेला हा सन्मान माझ्यासाठी भावनिक आणि अविस्मरणीय आहे.

रामदास झेंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले. आईने काळ्या मातीत घाम गाळून आम्हाला चांगले दिवस दाखवले. तिच्याच संघर्षातून प्रेरणा घेत ज्येष्ठांचा सन्मान करण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी बाळासाहेब नाहाटा, राजेंद्र म्हस्के, दिनकर पंधरकर, सोपानराव मुळे, हेमंत नलगे, पुरुषोत्तम लगड, नवनाथ बोडखे, संजय धामणे, संतोष पंधरकर, पोपटराव पवार, रेवणनाथ गिरमे आणि राणी झेंडे यांनी शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंदाश्रम स्वामी व रामेश्वर तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले, तर आभार प्रदर्शन रमेश झेंडे यांनी मानले.

# गंगागिरी महाराजांच्या सप्ताहासाठी रस्ते तातडीने दुरुस्त करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या गंगागिरी महाराजांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी राज्यभरातून जवळपास एक कोटी भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर धनगरवाडी गावाला जोडणाऱ्या सर्व प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीच्या सोयीसाठी तातडीने रस्त्यांची दुरुस्ती व नव्याने बांधकाम करण्यात यावे, अशी जोरदार मागणी शिवसेना युवा नेते अभिजीत पोटे यांनी केली आहे.

झालेल्या रस्ता सुरक्षा समिती बैठकीत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याचे नमूद करत, २१ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजता होणाऱ्या ऑनलाईन रस्ता सुरक्षा समिती बैठकीमध्ये त्यांच्या निवेदनातील प्रश्नांचा समावेश करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

अभिजीत पोटे यांनी दिलेल्या निवेदनानुसार धनगरवाडी परिसरातील अनेक महत्त्वाचे रस्ते अतिशय खराब अवस्थेत आहेत. पुणतांबा- जळगाव - वाकडी - दिघी या मार्गावरील सुमारे २५ किलोमीटरचा प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्ता नव्याने करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गणेशनगर फाटा ते वाकडी टर्निंग पॉईंट दरम्यानचा २ किलोमीटर जिल्हा परिषद रस्ता देखील पूर्णतः खराब झाल्याने त्याचे तातडीने नूतनीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

श्रीरामपूर एमआयडीसी ते धनगरवाडी दरम्यानचा ७०० मीटरचा रस्ता जड वाहतुकीमुळे पूर्णपणे खराब झाला असून, एमआयडीसीतील अवजड वाहनांची क्षमता लक्षात घेऊन मजबूत डिझाईनचा नवीन रस्ता उभारण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय धनगरवाडी रेल्वे अंडरपासमार्गे गावापर्यंतचा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता नव्याने तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मराठवाड्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणारा खैरी ते नाऊर आणि पुढे श्रीरामपूर - गोवर्धन मार्गे सराला बेटाला जोडणारा एकूण १२ किलोमीटरचा रस्ता देखील अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे पोटे यांनी निदर्शनास आणून दिले. हा रस्ता नव्याने झाल्यास मराठवाडा आणि धनगरवाडी यांतील संपर्क वाढून प्रवासाचा वेळ केवळ ३० मिनिटांवर येईल. तसेच समृद्धी महामार्गालाही या मार्गाचा मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# गृहउद्योजिका मीरा बेरड यांना ‘परिणीता सन्मान २०२६’ प्रदान

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

शहरातील गृहउद्योजिका मीरा बाळासाहेब बेरड यांना खारघर, नवी मुंबई येथे परिणीता सोशल फाऊंडेशनच्या वतीने प्रतिष्ठेचा ‘परिणीता सन्मान २०२६’ प्रदान करण्यात आला. महिला उद्योजकतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या मीरा बेरड यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.

लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर (नवी मुंबई) येथील बॅन्क्वेट हॉलमध्ये झालेल्या भव्य सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी चित्रपट निर्मात्या अमृता राव, मानसी इंगळे, मधुराज बिल्डर्सचे मधु पाटील, ईपीआरच्या संचालिका अपर्णा शाह यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून महिला उद्योजिकांचा गौरव केला.

नगर तालुक्यातील दरेवाडी गावच्या रहिवासी असलेल्या मीरा बेरड यांनी स्वामी समर्थ स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून स्वतःचा ‘अमृत फूड प्रोडक्ट्स’ हा गृहोद्योग सुरू केला. अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून सुरू झालेला हा व्यवसाय आज यशस्वी उद्योगात परिवर्तित झाला आहे. गेल्या पाच वर्षांपासून त्या विविध खाद्यपदार्थांचे उत्पादन करून बाजारपेठेत स्वतःचा वेगळा ठसा उमटवत आहेत.

मीरा बेरड यांनी बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व्यवसाय उभे केले आहे. या उद्योगामुळे अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. केवळ रोजगारच नव्हे, तर महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याचे कामही त्या सातत्याने करत आहेत. त्यांच्या प्रेरणेतून अनेक महिलांनी लघुउद्योग क्षेत्रात पाऊल टाकले असून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

‘अमृत फूड प्रोडक्ट्स’ अंतर्गत तयार होणाऱ्या विविध खाद्यपदार्थांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळत आहे. अहिल्यानगरसह महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये या उत्पादनांना मागणी असून आता हे पदार्थ देशविदेशातही पाठवले जात आहेत.

# पाथर्डीत घरगणनेच्या कामाला वेग

## उन्हाळा, सुट्ट्या आणि दुर्गम वस्त्यांमुळे अडचणी । नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**पाथर्डी । वीरभूमी-**

पाथर्डी शहरासह तालुक्यात सध्या घरगणनेच्या कामाला वेग आला असून जनगणना अधिकारी व कर्मचारी घरोघरी जाऊन नागरिकांच्या घरांची माहिती संकलित करत आहेत. १६ मेपासून जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली असून प्रशासनाच्या नियोजनानुसार हे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यापूर्वी १ ते १५ मेदरम्यान स्वगणनेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला होता.



दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक कुटुंबाची माहिती, घरांची स्थिती, सदस्यसंख्या तसेच मूलभूत सुविधांची नोंद करण्यात येत आहे. यासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी शहरातील विविध प्रभागांसह ग्रामीण भागातही भेटी देत आहेत. नागरिकांनी अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, वाढलेली उन्हाची तीव्रता आणि शाळांच्या सुट्ट्यांमुळे अनेक कुटुंबे बाहेरगावी गेल्याने कर्मचाऱ्यांना काही प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी नागरिक दिवसाच्या वेळेत घरात उपलब्ध नसल्याने कर्मचाऱ्यांना पुन्हा भेट द्यावी लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

ग्रामीण भागातही घरगणनेदरम्यान महत्त्वाचे बदल समोर येत आहेत. पूर्वी गावठाण परिसरात वास्तव्यास असलेली अनेक कुटुंबे आता शेतीवरील वस्त्यांवर स्थलांतरित झाली आहेत. त्यामुळे गावठाणापेक्षा शेतवस्त्यांवरील घरांची संख्या वाढल्याचे दिसून येत आहे. परिणामी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दुर्गम वस्त्यांपर्यंत जाऊन माहिती संकलित करावी लागत आहे.

प्रशासनाकडून जनगणना प्रक्रिया अचूक आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी विशेष दक्षता घेतली जात असून प्रत्येक नागरिकाची नोंद सुनिश्चित करण्यावर भर दिला जात आहे. जनगणना ही शासनाच्या विविध योजना, विकासकामे आणि भविष्यातील धोरण निश्चितीसाठी महत्त्वाची प्रक्रिया असल्याने नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### जनगणना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

शासनाच्या जनगणना मोहिमेसाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महसूल विभाग तसेच नगरपालिका कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र या कामादरम्यान कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही पुढे येत आहे. मागील आठवड्यात जनगणनेच्या कामावर जात असताना झालेल्या अपघातात एक कर्मचारी गंभीर जखमी झाला असून इतर काही जण किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. तसेच एका ठिकाणी कर्मचाऱ्याला कुत्र्याने चावा घेतल्याची घटनाही समोर आली आहे. त्यामुळे जनगणना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यक्त होत आहे.